शोधपत्र

March, 2010

# ‘तिंगाड’ मधील विनोदी संवाद : एक चिकित्सा

*प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते

* श्री गुरुबुद्धि स्वामी महाविद्यालय, पूर्णा, परभणी

पुणे - बंगलोर महामार्गावर असलेल्या कर्नाटक राज्यात निपाणी ता. चिक्कोडी जि. बेळगाव या गावातील जुन्या स्टँड परिसरात पिठाची गिरणी चालवणारी एक व्यक्ती दिसेल. ती म्हणजे प्रचंड ताकदीचा ग्रामीण कथा-कादंबरीकार महादेव मोरे - महादेव मोरे गेली कित्येक वर्षे ही पिठाची गिरणी चालवता चालवता अस्सल ग्रामीण साहित्य जन्माला घालतात. निपाणीत मध्यमवर्गात जन्माला आलेल्या महादेवरावांना कोणत्याही विद्यापिठीय पदव्यांची बिरुदावली लाभलेली नाही. त्यांच्या घरी कसलीही साहित्य परंपरा नव्हती किंवा त्यांचे बोट आपल्या हातात धरुन त्यांना सरस्वतीच्या दरबारात कोणीही मान्यवर साहित्यिकाने आणलेले नाही. पण म्हणतात ना..Great Literary persons are bourn they are not made या उक्तीप्रमाणे महादेवराव स्वयंभू साहित्यिक आहेत. मराठी वाङ्मयाची आवड, मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण यातूनच त्यांची साहित्यिक प्रतिमा निर्माण होत राहिली आहे.

तसेच महादेव मोरे यांचा ‘तिंगाड’ हा विनोदी कथासंग्रह आहे. निपाणीच्या परिसरात त्यांच्या बहुतेक कथा घडतात. आतापर्यंत कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि तळागाळातील लोकांच्या सुखदु:खांचे विदारक आणि प्रत्ययकारी दर्शन त्यांच्या बहुतेक कथांमधून वाचकांना झाले आहे. कथासंग्रहा द्वारे श्री. महादेव मोरे यांनी विनोदी कथा-प्रांतातही आपल्या लेखणी ची हुकूमत दाखवून दिली आहे. शब्दांची विनाकारण उधळमाधळ न करता, मोजक्या शब्दांतून ते आपल्या कथेतील व्यक्ती, त्यांच्या सवयी, त्यांचे स्वभाव इत्यादी नेमकेपणाने उभे करतात. खुसखुशीत संवाद हे त्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य मानावे लागेल. निपाणीच्या आसपासची बोलीभाषा अत्यंत चपखळपणे आपल्या कथांतून त्यांनी वापरली आहे. ‘डोक्यालिटी’ सारखा नवीन शब्द त्यांच्या कथांतून समर्पकपणे वापरलेला दिसतो. कथेच्या सुरुवातीपासूनच त्यांची कथेवरील पकड अशी की वाचक शेवटपर्यंत आपसूचकच खेचला जातो. ‘तिंगाड’ ही या संग्रहातील सर्वात उत्तम अशी कथा आहे. अगदी मोजक्या शब्दांतून शिदगौडा खोत, एस. निजलिंगअप्पा आणि इतर सामान्य गावकरी यांची सुरेख शब्दचित्रे मारे यांनी आपल्या लेखणीने नेमकेपणाने उभी केली आहेत. खोताच्या विवंचना, खोताकडे राबणाऱ्या गावकामगारांच्या अडचणी, पुरासारख्या संकटांचासुद्धा आपल्या फायद्यासाठी उपयोग करुन घेणाऱ्या पुढाऱ्यांचा संधिसाधूपणा अशा अनेक पातळ्यांवर ही कथा घडत असते. या सर्वांचा सुंदर गोफ मोरे यांनी अत्यंत कुशलतेने विणला आहे. जाळ ही कथासुद्धा खुसखुशीत संवादाने सजलेली आहे. ब्ल्यू फिल्मसारख्या चटकदार कथानकाच्या ओघात वाचकाला पुरता गुरुटून टाकते. या कथेच्या शेवटच्या वळणाने वाचकाला आचंबित करण्यात मोरे पूर्णपणे यशस्वी झाले आहेत. महापुरात सापडलेल्या माणसांची सुटका करण्याच्या घटनेवर लिहिलेली तिंगाड या कथसंग्रहांमधली याच शीर्षकाची कथा महत्त्वाची आहे. आदनाळ या खेड्यातील माणसं नदीच्या पुरामध्ये सापडतात. याची बातमी शासनाच्या अधिकाऱ्यांना मिळताच एकच धावपळ सुरु होते. याधावपळीचे अत्यंत विनादी चित्रण मोरे यांनी केले आहे. शेवटी पुरामध्ये अडकून पडलेल्यांना बाहेर काढले जाते. महापुरातून सुटका झाल्यानंतर सरकारी पाहुणचार घेणारे आकोबा आणि धोंडिबा यांच्या संवादातून विनोद निर्मिती होते. हाच संवाद खालील प्रमाणे आहे. “ह्येच्या बायली व्हेल एका रोजात दोनश्याची कमाई वरीसभर खोताच्यात वंगूनबी एवढं शिल्लक पडत नाही!” आठवड्याभराने धोंडिबाची निवांत भेट झाल्यावर आकोबाने बोलून दाखविलं. ‘आनी स्टीमर का काय म्हणत्यात त्या इंजनाच्या नावंत आपलं बापजादं तरी कवा बसलंतं, मर्दाच्या!!’ मनोमन खूष असलेल्या धोंडिबानेही सूर ओढला, ‘आनी प्याकबंद डब्यातलं ते ग्वाडग्वाड फळाचं तुकडं! झालं तर त्ये ह्यो जंक्शन बनपाव... कवा खाल्लाताव् आपुन जल्मात?’

‘व्हय तर!’ आणि आकोबा म्हणाला, ‘खरं सांगू का तुला, अगदी मनातलं खोलवरलं? येत्या सालीबी असा महा पूर आला तर आपुन तर बाबा पुरात आडकून बसायचं तिंगाड करणार!! कसं...?’ या संवादामधून माणसांच्या स्वभावातील पैलूविषयी एक

स्वतंत्र विनोद रुप मोरे साकार करतात. याच कथासंग्रहातील 'वैकुंठ', 'जाळ', 'हुमान' या कथांमधून वेगवेगळ्या रुपाचा विनोद चित्रित होतो. 'जाळ', मधील काळे धंदे करणारे मालक पोलिसांना हाताशी धरुन सर्वसामान्य माणसांना कसे धाकटपटशा करतात. व्हिडिओ सेंटरचे मालक ब्ल्यू फिल्म लावून आपणच पोलिसात कळवितात. पोलीस छापा टाकून फिल्म जप्तीचे फक्त नाटक करतात व प्रेक्षकांना धाक दाखवून पैसे उकळतात. समाजामध्ये असेच एकमेकांच्या संगनमतातून सामान्य माणसांना छळले जाते याचे गंभीर स्वरूपाचे वास्तव मोरे विनोदी अंगाने चित्रित करतात. हुमान या कथेतील खरेतर अश्लील स्वरूपाची गोष्ट महादेव मोरे अत्यंत संयमात पद्धतीने विनोद निर्माण सादर करतात. डॉ. पावसकर नावाच्या पात्राला गावातील एक टॅक्सी ड्राव्हर गणपती दिवळीत बसविणे हे हुमान घालतो. डॉक्टरांना या हुमानाचा अर्थ कळत नाही व गावातील कुणीही सांगत नाही. शेवटी डॉक्टर पावसकरच आपल्या ड्रायव्हरला विचारतात. ड्रायव्हर भित्रा असतो, कारण डॉक्टरांच्या बायकोबरोबर त्याचे शरीरसंबंध आहेत हे डॉक्टरांना समजले की काय असे ड्रायव्हरला वाटते. पण डॉक्टर हुमानाचा अर्थ विचारतात म्हटल्यावर तो त्यांच्या कानात सांगतो. ते ऐकून डॉक्टरांनी आपला टाळा पसरला आहे तो तसाच कायम राहतो. या घटनेचे वर्णन मोरे विनोदाच्या रुपातून सादर करतात.

'वैकुंठ' या कथेत नगरपालिकेचे राजकारण त्याशी संबंधित लोकांचे साटेलोटे आणि हेवेदावे यांचे चित्रण आले आहे. योगायोगाने स्वत: नगराध्यक्षाला मरुनच वैकुंठ स्मशानाचे उद्‌घाटन करण्याचा प्रसंग येतो. नगरपालिकेतील ऑफिसर, इंजिनियर यांचे पैसे खाणे आणि नगरसेवकांची सभेतील हमरीतुमरी यांचे वर्णन वाचताना वाचकाला आपल्याच गावातील नगरपालिकेच्या कारभाराचे वर्णन वाचत असल्याचा भास होईल. श्री शिपायाची कचरापेटीच्या संदर्भात नगरसेवकांवरील स्वगतवजा टिप्पणी अत्यंत मार्मिक आहे. बाप यासहीने लिहिलेले पत्र नगरपालिकेच्या एकंदर कारभारावर अचूक भाष्य करते. या कथेत नागरिकांच्या सूचना - पत्रांचा काहीसा अतिरेक झाला आहे. त्यामुळे कथा पसरट होत जाते. तिंगाडमधील गस्त, इलेक्शन, शिकार याही कथा विनोदी स्वरूपाच्याच आहेत. 'गस्त' या कथेत चोरांच्या भितीने गावामध्ये सुरू झालेल्या गस्तीचे विनोदी वर्णन मोरे करतात. पहिल्याच रात्री गस्त घालताना चोरून दारू विकणारा दारूवाला सापडतो. तो दारूचा फुगा सोडून पळून जातो. त्यातील फुकटची दारू सगळे पितात. त्यांना नशा चढल्यावर चोरं त्यांच्या समोरून चोरी करून निघून जातात. याचे भान त्यांना राहात नाही. सकाळी उठल्यावर रामा थोरवताला आपले किराणा दुकान लुटलेले दिसते. हे पाहून रात्रीचा प्रसंग त्याला आठवतो व तो देवादिकांना शिव्याशाप घालतो. या प्रसंगाचे मोरे यांनी विनोदी अंगाने चित्रण करून वाचकांच्या मनात रंजनाची धमाल उडवून दिली. 'इलेक्शन' या कथेमधील नगरपालिकेच्या राजकारणातून गावामध्ये जे वातावरण तयार होते, त्यातील अनेक प्रवृत्ती व छंदीफंदी माणसांच्या स्वभावाचे वर्णन मोरे करतात.

महादेव मोरे यांच्या अत्यंत अस्सलपणे विनोद निर्मितीचे परिपूर्ण रूप म्हणून त्यांच्या 'तिंगाड' या संग्रहातील 'शिकार' या कथेतील विनोद महत्त्वाचा आहे. ही गोष्ट खरेतर समाजामध्ये लोकथेच्या रुपात अनेकांच्या ओठांवर पहायला मिळते. परंतु मोरे यांनी आधुनिक काळातील समाजामध्ये काही धोंडिबासारखे छंदी माणसं, काही अप्पासाहेब यांच्यासारखे माणसं वावरताना दिसतात. त्यांच्या वागण्यातून व व्यवहारातून काही अनपेक्षित लबाडं गोष्टी घडतात. अशाच एका घटनेवर ही कथा आधारित आहे. चटकदार सुरुवात असलेली 'हुमान' ही कथा प्रथम अपेक्षा वाढवते. परंतु नंतर कोठच्या कोठे भरकटत जाते. वाचकाला आपल्या लेखणीच्या संमोहात बांधून ठेवणारे मोरे, कथेच्या बांधणीत इतका ढिसाळपणा कसा येउ देतात ? सुरुवात आणि शेवट यात एकसुत्रता न राहिल्यामुळे ही कथा रोचक असली तरी केवळ किस्सेवजा प्रसंगांची जंत्री झाली आहे. कथेच्या शीर्षकाशी इमान राखण्यासाठीच जणू शेवट ओढून ताणून आणल्यासारखा वाटतो.

गस्त, इलेक्शन, आणि शिकार या तीन कथा वाचताना शेवटचा जवळ जवळ अंदाज येतो. त्यामुळे या कथा संग्रहात वाचताना अपेक्षित परिणाम साधत नाहीत. स्वतंत्रपणे वाचताना मात्र त्या जास्त परिणामकारक वाटतील. गस्त मधील रामा किंवा इलेक्शन मधील गुंडून्हावी अशा व्यक्ती ग्रामीण विनोदी कथांमधून थोड्याफार फरकाने भेटतातच. विशेषत: गस्त आणि शिकार या दोन विषयांवर लिहिण्याचा मोह बहुतेक विनोदी लेखकांना होतोच असे दिसते. या संग्रहातील 'शिकार' ही कथा मात्र खुसखुशीत भाषाशैलीमुळे उठावदार झाली आहे. हरकाम्या ड्रायवरच्या प्रथम पुरुषी निवेदनातून ही कथा फुलत जाते. त्यामुळे या कथेचा बाज काहीसा वेगळा झाला आहे. एकंदरीत तिंगाड (म्हणजे गुंता) या संग्रहामुळे श्री. मोरे यांच्या विनोदी लेखनाबद्दल अपेक्षा वाढतात. यापुढे आणखी सकस विनोदी कथा मोरे यांच्याकडून लिहिल्या जातील अशी आशा करूया !

## संदर्भ ग्रंथ

१) महादेव मोरे : तिंगाड - मेहता पब्लिशिंग हाउस, पूणे - ३० प्रथम आवृत्ती - १९९३